3

CR2005060903

अर्जित रजा अथवा वैद्यकीय रजा मंजूर करण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : समय-१०.०१/प्र.क्र.१६/२००१/१८ (र. व का.),
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ जून,२००५.

# परिपत्रक

कर्मचा-यांमध्ये नैमित्तिक रजा खर्च करुन टाकण्याची व नैमित्तिक रजा शिल्लक नसल्यामुळे अल्पकालावधीसाठी अर्जित रजा मागण्याची प्रवृत्ती वाढत चालल्याचे निदर्शनास आल्यामुळे शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग. क्रमांक-आस्था-१०९६/प्र.क्र.१२७/९६/१९, दि.२५ ऑक्टोबर,१९९६ अन्वये कमीत कमी पाच दिवसांची परिवर्तित / अर्जित रजेची मागणी असेल तरच रजा मंजूर करण्याचा विचार करण्यात येईल असे ठरविण्यात आले होते. तथापि, अल्प कालावधीसाठी विशिष्ट कारणांकरिता रजा आवश्यक असताना नाईलाजास्तव अधिकारी / कर्मचा-यांना किमान पाच दिवसाची अर्जित रजा / परिवर्तित रजा घेणे भाग पडत होते हे विचारात घेऊन तसेच कर्मचा-यांच्या विनंतीचा विचार करुन असा निर्णय घेण्यात आला आहे की,जर अशी रजा संयुक्तिक कारणासाठीच घेतली आहे असे आस्थापना अधिका-यांचे समाधान झाल्यास तीन दिवसांची अर्जित रजा अथवा परिवर्तित रजा मंजूर करण्याबाबत विचार करण्यात यावा.

मंत्रालयातील सर्व विभागांतील आस्थापना शाखांस कळविण्यात येते की,त्यांनी त्यांच्या विभागातील अधिकारी / कर्मचा-यांस तीन दिवसांची अर्जित / परिवर्तित रजा मंजूर करताना सदर परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(संजय उबाळे)
सचिव (प्र.सु. व र. व का.व दि.प्र.)

S-13